# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १५५ वा ❑ भारतीय सौर दिनांक १० श्रावण शके १९४८, शनिवार दि.०१ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## लोकशाहीत भाषेची मर्यादा आणि संवाद

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

लोकशाहीत भाषेची मर्यादा आणि संवाद म्हणजे विचार स्वातंत्र्याची हमी, संविधानात्मक बंधने आणि परस्पर आदराची चौकट होय. भाषा हे संवादाचे माध्यम असले तरी अनिर्बंध किंवा द्वेषयुक्त भाषेमुळे लोकशाहीचे आरोग्य बिघडू शकते.

प्रत्येक नागरिकाला आपले विचार मांडण्याचा समान अधिकार असतो.सुदृढ संवादातून लोकशाहीत धोरणे आणि निर्णयांवर खुली चर्चा होते.वेगवेगळ्या विचारांचा व भाषांचा स्वीकार करणे लोकशाहीला बळकट करते.ज्या भाषेमुळे हिंसाचार किंवा तेढ निर्माण होते, ती लोकशाहीत मान्य केली जात नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ कोणाचा अवमान करणे किंवा चुकीची माहिती पसरवणे असा होत नाही.

लोकशाहीत भाषेची मर्यादा आणि संवाद अत्यंत महत्त्वाचा असतो. कारण आदरयुक्त भाषा संवादाची ताकद टिकवून ठेवते. लोकशाहीचे सौंदर्य आणि संवाद टिकवण्या भाषेमध्ये आहे लोकशाहीची सर्वात मोठी ताकद आपला आवाज आहे. पण तिचे सर्वात मोठे सौंदर्य आपली भाषा आहे. असहमती आवश्यक आहे. प्रश्न विचारणेही आवश्यक आहे. सरकारला जबाबदार बनवणेही आवश्यक आहे. पण जर आपण आपल्या भाषेची मर्यादा गमावली, तर आपल्या बोलण्याची ताकदही कमी होते.

मतभेद असले तरी भाषेचा संयम राखल्यास मुद्दा अधिक प्रभावीपणे समोर येतो.अयोग्य शब्दांमुळे मुद्द्याचे गांभीर्य कमी होते आणि विचारांची धार कमी होते.सरकारला प्रश्न विचारताना किंवा असहमत दर्शवताना भाषेची सुसंस्कृतता राखणे आवश्यक असते.

लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्याला खूप महत्त्व आहे, पण त्या स्वातंत्र्यासोबतच भाषेची सभ्यता राखणे तितकेच गरजेचे आहे.जेव्हा आपण भाषेची मर्यादा ओलांडतो, तेव्हा आपल्या मुद्द्यातील गांभीर्य नष्ट होते. विचारांमध्ये कितीही फरक असला, तरी समोरच्या व्यक्तीचा आदर राखणे हीच आपली संस्कृती आहे. सरकारला किंवा व्यवस्थेला प्रश्न विचारणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आणि कर्तव्य आहे. लोकशाहीत वेगवेगळ्या विचारांचे स्वागत झाले पाहिजे, पण तिथे वैयक्तिक चिखलफेक नसावी.

जंतर-मंतरमध्ये काय घडले? काय झाले? कोणत्या भाषेचा वापर केला गेला याचा इतिहास साक्ष आहे. घटनात्मक पदावर बसलेल्या व्यक्तीबद्दल वैयक्तिक बोलणे , चारित्र्यावर शिंतोडे उडविणे खालच्या भाषेत वापर करणे अत्यंत गैर व चुकीचे आहे हा सर्व प्रकार जंतर-मंतरमध्ये आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांकडून प्रदर्शन झाले.विद्यार्थी किंवा आंदोलकांच्या मुख्य मागण्या आणि प्रश्नांऐवजी आंदोलनांमध्ये राजकीय घोषणाबाजी जास्त होताना दिसल्या आंदोलनांदरम्यान देशातील सर्वोच्च पदांवर असलेल्या व्यक्तींबद्दल, जसे की पंतप्रधानांबद्दल, अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन शिवीगाळ आणि आक्षेपार्ह घोषणाबाजी केल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

पंतप्रधानांना अर्वाच्य किंवा खालच्या भाषेत शिवीगाळ करणे हा कायदेशीर गुन्हा असून, अशा प्रकारच्या घटनांवर विविध राजकीय पक्ष आणि सेलिब्रिटींकडून तीव्र निषेध व्यक्त केला गेला आहे. सोशल मीडिया किंवा सार्वजनिक व्यासपीठांवर मानहानीकारक भाषा वापरल्यामुळे संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई व गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

आंदोलन स्थळी अनेकदा शिस्तीचा अभाव, हुल्लडबाजी आणि अश्लील वर्तन झाल्याचे आरोप झाले आहेत, ज्यामुळे आंदोलनाचे गांभीर्य कमी झाले.

पंतप्रधानांविन विरुद्ध आक्षेपार्ह व्हिडिओ किंवा सोशल मीडिया पोस्ट केल्याने पोलिसांनी विविध कलमांखाली गुन्हे दाखल केले आहेत. सार्वजनिक जीवनातील उच्च पदांवर असलेल्या व्यक्तींचा आणि लोकशाहीच्या मर्यादांचा सन्मान राखला जावा, अशी भूमिका विविध स्तरांवर मांडली गेली आहे.

स्वतःला झेन जी व सुशिक्षित बनविणाऱ्या विद्यार्थ्यांनी अश्लीलतेची सीमा पार करून टाकली. विशेष म्हणजे मुलींनी अश्लीलतेची सीमा पार करून टाकली. लोकं ती भाषा नको ते मीन्स, नको ते पोस्टर्सचा बाजार जंतरम मंतर मध्ये बघायला मिळाला. शिक्षित मुली मुलं अश्लील हावभाव करताना दिसले सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे अगदी तरुण मुली कॅमेऱ्यासमोर निर्लज्जेपणे अश्लील शिवीगाळ करताना दिसत होत्या त्यांच्या हातातील काही फलक इतकी आक्षेपारे होते की ते सभ्य समाजाला व त्यांच्या च पालकांना मोठ्याने वाचनिक कठीण वाटावे.

काँग्रेस नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि प्रियंका गांधी यांनी संसदेच्या मकर द्वाराजवळ आणि पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर धरणे आंदोलन करत या आंदोलनाला तीव्र पाठिंबा दिला. यादरम्यान राहुल गांधी आणि इतर अनेक नेत्यांना पोलिसांनी ताब्यातही घेतले होते.मात्र पंतप्रधानाविरुद्ध आक्षेपार्ह वक्तव्य व व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आल्यावर देखील विरोधी पक्षांनी सी जे पी च्या या वक्तव्याचा निषेध देखील केला नाही,ही अतिशय चिंताजनक बाब आहे.

थोडक्यात सांगायचे तर, लोकशाहीत भाषेचे स्वातंत्र्य अमूल्य आहे, पण त्या स्वातंत्र्यासोबत येणारी जबाबदारी ओळखणे म्हणजेच भाषेची मर्यादा पाळणे होय. जेव्हा संवादामध्ये मर्यादा आणि आदर पाळला जातो, तेव्हाच लोकशाही खऱ्या अर्थाने मजबूत होते.

# डॉ. हेडगेवार आणि संघ हे एकमेकांपासून अभिन्न आहेत - डॉ. मोहन भागवत

## डॉ. हेडगेवार निवासावर विशेष आवरण, माहिती पुस्तिकेचे आणि सचित्र टपाल मोहर यांचे लोकार्पण

ज्योतिर्मय साहित्य

नागपूर - नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या ऐतिहासिक निवासस्थान डॉ. हेडगेवार निवास वर आधारित विशेष आवरण, माहिती पुस्तिका आणि कायमस्वरूपी सचित्र टपाल मोहर यांचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला. भारतीय टपाल विभाग, नागपूरद्वारे हा कार्यक्रम पार पडला.

या प्रसंगी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी सांगितले की, डॉ. हेडगेवार आणि संघ हे एकमेकांपासून अभिन्न आहेत. त्यांच्या आयुष्यात संघकार्य आणि राष्ट्रकार्याव्यतिरिक्त कोणताही दुसरा विषय नव्हता. याच ऐतिहासिक इमारतीच्या वरच्या मजल्यावर असलेल्या त्यांच्या खोलीत विजयादशमीच्या दिवशी राष्ट्रीय



स्वयंसेवक संघाची स्थापना झाली होती.

डॉ. भागवत पुढे म्हणाले की, त्याकाळी संघ लहान होता, परंतु आज त्याचे कार्य देशभरात व्यापक प्रमाणावर पोहोचले आहे. संघ कार्याचा विस्तार झाला असून देश-विदेशात त्याबद्दलची उत्सुकता सातत्याने वाढत आहे. माणूस घडवण्याची संघाची कार्यपद्धती आज विकासाच्या मार्गावर असलेल्या अनेक देशांची गरज बनत चालली आहे. व्यक्ती निर्माणाची ही प्रभावी पद्धती उपयुक्त सिद्ध होत आहे.

भारतीय टपाल विभागाचे आभार मानताना त्यांनी सांगितले की, विशेष आवरण, माहिती पुस्तिका आणि कायमस्वरूपी सचित्र टपाल मोहर जारी करून विभागाने माणूस घडवण्याच्या या कार्याबद्दल आपली सद्भावना व्यक्त केली आहे. यामुळे संघाचे कार्य आणि त्याच्या उद्देशाची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल तसेच समाजात या कार्याला नवी गती मिळेल.

या कार्यक्रमाला सह प्रांत संघचालक श्रीधर गाडगे, महानगर संघचालक राजेश लोया, नागपूर क्षेत्राचे टपाल सेवा संचालक डॉ. सुधीर जाखेरे, महाराष्ट्र व गोवा परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये, टपाल विभाग नागपूरचे अधिकारी व कर्मचारी तसेच डॉ. हेडगेवार स्मारक समिती नागपूरचे सदस्य उपस्थित होते.

# ग्रामीण लोकसाहित्याचे महामेरु- लोकशाहीर आण्णाभाऊ साठे

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती शिवाजी महाराजांचे महान कार्य रशियामध्ये जाऊन सांगणारे लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची आज जयंती. त्यांनी दीड दिवसात शाळा सोडून दिली. आणि त्यांचे साहित्य अजरामर झाले. ही कोणती काल्पनिक घटना नसून वास्तविकता आहे.

याची दखल घेऊन शासनाने त्यांचा जन्मदिन ''लेखन प्रेरणा दिन'' म्हणून संपूर्ण विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा यामध्ये साजरी करण्याचे आदेश दिले. यावरून त्यांच्या कार्याची पावती त्यांना मिळाली हा आनंद आपणांस सर्वांना होत आहे.


संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी प्राणपणाने आपली शाहिरी गाजवली. प्रत्येक माणसाच्या अंगात वीरश्री संचारत होती. डफावर गायलेली शाहिरी

माझी मैना गावाकडे राहिली
।माझ्या जीवाचे होते या काहीली।।

या स्फूर्तीदायी गीतातून त्यांनी उभ्या महाराष्ट्राच्या मनातील चेतना पेटवल्या. असा महान साहित्यिक पुन्हा होणे नाही. असे मला वाटते.

तळागाळातील समाजात जन्माला आलेले हे रत्न खरोखर २४ कॅरेट अस्सल सोनं आहे. फकीरा कादंबरी लिहून त्यांच्या साहित्याची उंची त्यांनी जगाला दाखवून दिली. व्यक्तीची जात महत्त्वाची नसून त्यांचे कर्तृत्व महत्त्वाचे आहे.

हे त्यांनी त्यांच्या लेखणीतून



दाखवून दिले. म्हणूनच त्यांचा जन्मदिन लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे.

हेच त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांना वाहिलेली ही महत्त्वपूर्ण आदरांजली ठरेल. वैजयंता,टिळा लावते मी रक्ताचा, वारणेचा वाघ, मुरली मल्हारी रायाची, अशी ही साताऱ्याची त-हा, डोंगरची मैना हे चित्रपट निघाले. त्याने लिहिलेल्या वरील कादंबरीवर अनेक चित्रपट निघाले.खरोखर या सगळ्या चित्रपटातून मानवाचे वास्तववादी लेखन त्यांनी केले.


त्यांच्या साहित्यामध्ये अभिरुची, अभिव्यक्ती, दर्जेदार साहित्य, वीर रसातील पोवाडे, सुलतान नावाचे नाटक त्यांनी लिहिले

३५ कादंबऱ्या आणि अनेक नाटके, कथा, पोवाडे, माझा रशियाचा प्रवास, स्मशानातील सोनं, सापळा, लिहून सुद्धा भारत सरकारने त्यांना कोणताही पुरस्कार दिलेला नाही.

भारतरत्न, महाराष्ट्र भूषण असे पुरस्कार आजतागायत त्यांना मिळालेले नाहीत. याबद्दल खंत वाटते. काय कमी आहे त्यांच्या साहित्यामध्ये याचा विचार आम्ही करत आहोत. अनेक विद्यापीठां मध्ये त्यांच्या कादंबऱ्या अभ्यासक्रमाला आहेत. आणखी काय करायला हवे होते.

तेव्हा त्यांना भारतरत्न देता आले असते हे आम्हांला कळाले तर बरे होईल. फकीरा सारखी कादंबरी लिहून त्यांनी वास्तविकता मांडली आणि डॉ. बाबासाहेब यांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली. इंग्रजांच्या काळामध्ये सुद्धा या नायकाने धान्य लुटून आपल्या गोरगरिबांना, अनाथांना, दलितांना वाटप करणारा हा व्यक्ती त्यांनी चित्रित केला, त्यामुळे समाज व्यवस्था सुधारली त्यांचे साहित्य आणखीही म्हणावे तेवढे प्रकाश झोतात आले नाही . फकीरा कादंबरी ला शासनाने पुरस्कार दिला. ही कादंबरी २२ भाषेत भाषांतर झालेली आहे.

मरीआईचा गाडा या साहित्यकृती




तून जातीय व्यवस्था, अंधश्रद्धा त्यांनी बाजूला सारली आहे. अण्णाभाऊचे साहित्य वाचणारा व्यक्ती सुद्धा तेवढ्या तोलामोलाचा असावा लागतो. त्याला मानवतावाद कळाला पाहिजे. मनोरंजन म्हणून त्यांचं साहित्य कृपा करून वाचू नये. वास्तविकतेची झळ ज्यांना बसली त्यांनी बरोबर हे साहित्य वाचावे. नशिबाने काही मिळत नाही. परिश्रमाने सर्व काही मिळते. आजची परिस्थिती फार वेगळी आहे.अनेक लोकांनी आपल्या हातात वेगवेगळे झेंडे घेतले आहेत. त्यामुळे तो आपला नाही म्हणून त्यांच्या साहित्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. ही वास्तविकता आहे. फोडा आणि राज्य करा म्हटल्याप्रमाणे जाती-जातीमध्ये भेदभाव निर्माण करून एकमेकांचे महत्त्व कमी करण्याचा कुटील डाव सध्या खेळला जात आहे.

त्यामुळे त्यांचे महत्त्व वाढेल.

असे त्यांना वाटते.

परंतु लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य जोपर्यंत चंद्र, सूर्य ,तारे आहेत. तो पर्यंत ते जिवंत राहील. असे मला वाटते. म्हणूनच शासनाने एवढ्या वर्षानंतर विचार करून त्यांच्या साहित्यामध्ये असलेला दर्जेदार पणा आहे.

हे ओळखून साहित्य समितीने लेखन प्रेरणा दिन म्हणून त्यांचा जन्मदिन साजरा करावा.

असे सांगितले. खरोखरच त्यांच्या वरील सर्व कार्याला मानाचा मुजरा. विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता. मुखेड यांच्या वतीने त्यांना विनम्र अभिवादन..


ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

Sanjay Vyapari

Scan to pay with any UPI app

## नवोदित साहित्यिकांसाठी सुवर्णसंधी

ज्योतिर्मय साहित्य महाराष्ट्रातील सर्व नवोदित लेखकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ म्हणून पुढे येत आहे. फक्त साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील एकमेव ई-दैनिक ज्योतिर्मय साहित्य हे आहे.


मागील दीड वर्षात या व्यासपीठावरून साधारण 150 + साहित्यिक तयार झाले आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे.

नवोदित साहित्यिक या व्यासपीठावरून बिनधास्त लेखन करू शकतो कारण त्यांना योग्य मार्गदर्शन करणारी टीम येथे आहे. याचा अनुभव मागील वर्षात अनेक साहित्यिकांनी घेतला आहे. त्यांचे साहित्य या व्यासपीठावरून त्यांचा फोटो व मोबाईल क्रमांकासह देण्यात येते. त्यामुळे वाचक त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो.

ज्योतिर्मय च्या व्यासपीठावरून कोणीही आपले विचार मांडू शकतो, त्यांच्यासाठी अट फक्त एकच आहे. त्यांना रुपये पाचशे भरून वार्षिक सदस्यता घ्यावी लागते, नंतर ते वर्षात संपूर्ण 365 दिवस या व्यासपीठाचा वापर करू शकतात.

मित्रांनो मग वाट कसली बघता लगेच ज्योतिर्मय साहित्य चे मेंबर व्हा व लिहिण्यास सुरुवात करा, तुमचे उज्वल भवितव्य लवकरच येथे घडणार आहे.

@ संजय व्यापारी,
संपादक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे
वार्षिक वर्गणी 7743918559 या नंबरवर किंवा दिलेल्या QR Code वर ऑनलाईन पाठवा. व पैसे भरल्याचा स्क्रिनशॉट पाठवा.




## जात्यावरच्या ओव्या......

निज निज बाळा
नको झोळीतून पळू
ढीग कामाचा लागला
कधी दळण दळू? ||७७२||

निज निज बाळा
पाळणा सागवानी
त्याला रेशमाची दोर
चिमण्या, मोर, मणी ||७७३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५८





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

माणूस एकदा वासनेच्या अधीन झाला की त्याला दुसरे काही सुचत नाही. तो त्या सवयीचा गुलाम होतो आणि वेगवेगळ्या प्रकारे त्या गोष्टीचे समर्थन करू लागतो. धूम्रपान किंवा मद्यपान करणारे त्या गोष्टींचे समर्थन करीत असतात असे आपण अनेकदा पाहतो. म्हणजे त्यांना त्यात आपण काही वावगे करीत आहोत असे वाटतच नाही. राम गणेश गडकरी यांच्या एकच प्याला या नाटकात सुधाकर दारूच्या सवयीचा गुलाम होतो आणि त्यात त्याला काही वाटेनासे होते. परंतु नंतर ही दारू त्याच्या संसाराची धूळधाण करते. प्रख्यात गायक दीनानाथ मंगेशकर यांना देखील मदिरेचे व्यसन लागले होते आणि अति व्यसनामुळे त्यांचे अकाली निधन झाले. मुले लहान असताना संसार उघड्यावर टाकून निघून जावे लागले.



माणूस वृद्ध झाला, इंद्रिये थकली तरी देखील माणूस त्यातून बाहेर पडत नाही. शेवटपर्यंत विषय वासना त्याला त्रास देतच असतात. एखादी गोष्ट प्रत्यक्षात मिळाली नाही की मग तो कल्पनेच्या राज्यात रमतो, कल्पनेचे मनोरथ करू लागतो. आजच्या काळात तर टीव्ही, मोबाईल, सोशल मीडिया या सगळ्या आभासी गोष्टी कल्पनेच्या राज्यात माणसाला गुंतवून ठेवतात.

मग या सर्व गोष्टीतून सुटका करून घेण्याचा काही उपाय आहे का ? निश्चितच आहे ! समर्थ म्हणतात,''आपण निष्कामपणे रामाची चिंतन करावे, त्याचे ध्यान, मनन, चिंतन, पूजा करावी. हे सर्व संस्कार आहेत. त्यातून हळूहळू वाईट विषयांची कामना कमी होत जाते, मनामध्ये सद्वासना निर्माण होतात आणि शेवटी निर्वासना अवस्था निर्माण होऊन साधक मोक्षापर्यंत पोहोचतो. असा त्याचा प्रवास वाईटाकडून चांगल्याकडे होऊ शकतो.

पण इथे समर्थ आपल्याला निष्काम भक्ती करायला सांगतात हे लक्षात घ्यायला हवे. आपण सामान्य माणसे परमेश्वराची भक्ती देखील काहीतरी हेतू किंवा इच्छा मनात धरून करीत असतो. त्यामुळे आपली वासना शेवटपर्यंत सुटत नाही. हे ईश्वरा, मला अन्य काही नको. फक्त तू हवा आहेस अशा प्रकारची आर्तता जेव्हा भक्तीत येईल, तेव्हा आपली वाटचाल मोक्षमार्गाकडे व्हायला सुरुवात होईल.

या ठिकाणी संत ज्ञानेश्वरांचा अरे अरे ज्ञाना झालासी पावन हा अभंग आठवतो. त्यात ते म्हणतात,

(क्रमशः)



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏


## ॥ संजय उवाच... ॥



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ कौतुक
प्रत्येक चांगल्या कामाचे कौतुक झालेच पाहिजे, कौतुक कारण्यासारखे असेल तर नक्कीच केले पाहिजे त्याने कौतुक करणाऱ्याला बळ मिळते. कौतुक करणाऱ्याचे त्यात काहीच नुकसान होत नाही. कौतुक करायला पण मोठं मन लागतं.
(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## गुरू सांगेल तेच साधन



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ती सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदुःख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरू कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कुठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहत असतील; दुसरा कुणी आणखी कोणत्या गावी राहत असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले, तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पाहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात रहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा.

खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वतःकरता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. एकाने कोळशाचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले, तरी शेवटी फायदा किती होतो, याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर, परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी. हृदयी ठेवा राम । मुखी सदा त्याचे नाम । हातात असावे प्रपंचाचे काम । हेच खरे परमार्थाचे मर्म ।।

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### वारीतील आनंद

पुढे.......
आपली बुद्धी ही विश्व बुद्धीशी जोडल्या जाते व बुद्धीत यावेळेस जी स्फुरणा होते तो म्हणजे विवेक. अशा विवेकाच्या स्फुरणे तून पुढे ऋतंभरा प्रज्ञा प्रकट होणार असते. अशा विवेकाच्या साथीने आपल्याला परमात्म्या पर्यंत जायचे असते. इथे आत्मा हाच परमात्मा आहे ही अनुभूती येते. प्राणाचा मूलाधार ते सहस्त्रार हा सुशुमनेद्वारे होणारा प्रभास यालाच वारी म्हटले आहे. हा प्रवास म्हणजे वारी आहे. हे माऊलींना सुचवायचे आहे.
तेच प्रवृत्ती तरुचीया बुडी/
दिसती निवृत्ती फळाचीया कोडी/ जीए
मार्गीचा कापडी महेश अजुनी//
(मानवी पण विज्ञानी) या प्रवृत्ती रूप झाडाच्या बुडामध्ये (म्हणजे मुलाधारामध्ये )निवृत्तीची फळे करोडो दिसतात. अनादी सिद्ध महायोग विज्ञानी या पंथाचे अद्याप यात्री आहेत.
मुला धारा पासून बहि र्मुख मंडळ प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीच्या बुडाशी फलभोग विराग होईपर्यंत मुक्काम होऊन भूमंडळा वरून आकाश मंडला पर्यंत पूर्ण निवृत्तीत उड्डाण होते. मग पुढे महदाकाश व चिदाकाशात एक मुक्त फळ असते. सत्व गुणी जीव गुणातीत परम शिव होईपर्यंत श्री गुरु रूप महेशच भक्तास वाटाडे असतात.
प्रवृत्ती मार्गातून निवृत्ती मार्गात जाणारी ही वारी करणे माऊलीस अपेक्षित आहे. ही सर्वोच्च वारी आहे.
इतर संतांनी वारी करून अंगात सत्वगुण बाणावा अहंकार लीन करावा सर्व चराचरात परमात्मा पहावा व सर्वोच्च वारी साठी लागणारी पात्रता अंगात आणावी, हे शिकविले आहे, तर ज्ञानेश्वर महाराज अशी पात्रता आल्यानंतर पुढे सर्वोच्च वारी कशी करायची याची शिकवण देतात.
आपल्यालाही वारी घडावी व त्या वारी तून सर्वोच्च वारी घडावी या शुभ कामने सह लेखास विराम देतो.

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### लंपडाव आनंद किंवा सुखाचा

मित्रांनो, माणसाच्या जीवनात पैसा हेच सर्वस्व नाही, हे खरेच पण पैशाशिवाय काहीही होऊ शकत नाही, हेही तेवढेच खरे. पण गंमत अशी की, पैसा भरपूर पण सुख आनंद नाही व दुसरीकडे पैसा नाही म्हणून आनंद नाही, हा खरा जागंडगूत्ता आहे! आनंद सुखाच्या शोधात प्रत्येक जण आहे, पण ज्याचा त्याचा आनंद व सुखाचा क्षण वेगवेगळा आहे. असा हा सुखदुःखाचा, या तरंगाचे लंपडाव आहे, पण मला वाटते, प्रत्येकाने हे समजून घेतले पाहिजे की, आनंद ही घटना नाही तर ती ज्याची त्याची स्थिती आहे... म्हणून एखाद्या भक्ताची ब्रम्हानंदी टाळी लागते. सोप्या भाषेत आनंद व सुख एकच आहे, ते वेगवेगळे नाही, म्हणजे इच्छा पूर्ती झाली की आपण, स्वतःसी जोडले जातो. थोडक्यात काय तर घटनेचा परिणाम नाही तर ती जाणिवेची दशा किंवा मुळ स्थिती आहे, आणि ही स्थिती म्हणजे आपण स्वतः च आहोत.. असे राहा.. खर्च करू नका, पैसा कमवू नका असे नाही, पण आपण पैसै कशावर खर्च करतो, हे समजून घ्या, म्हणजे त्यात आणखी आनंद-सुख वाढविता येते.. हे पटते ना.. खरे ना.. मग मीही तेच सांगतो आहे.. हेच तरंग वाचा.. आनंदी व्हा.. काळजी घ्या.. गडे डे ..स्टे फीट, स्वस्थ राहा मस्त राहा..



## रक्तशुद्धी आणि त्वचेच्या सर्व समस्यांवर कडुनिंब आहे निसर्गाचे वरदान!

ज्योतिर्मय साहित्य

२. त्वचेचे सर्व आजार आणि इन्फ`क्शन गायब...

त्वचेवर येणारे लाल फोड, सततची खाज, खरुज, नायटा किंवा उन्हाळ्यातील घामोळे यावर कडुनिंबाचे पाणी म्हणजे एक जालीम उपाय आहे. हे पाणी त्वचेवरील सर्व हानिकारक बॅक्टेरिया मारून टाकते.

३. रोगप्रतिकारशक्ती (इम्म्युनिटी) वाढते...

कडुनिंब शरीराची आतून ताकद वाढवतो. हवामान बदलल्यामुळे होणारे संसर्गजन्य आजार, सर्दी-खोकला यापासून संरक्षण मिळते.

४. पोटातील जंतू आणि मधुमेहावर नियंत्रण... कडुनिंबाची पाने पोटातील जंतू नष्ट करून पचन सुधारतात, तसेच रक्तातील साखरेची पातळी (ब्लड शुगर ) नियंत्रणात ठेवण्यासाठीही ती खूप उपयुक्त ठरतात.

कसा करावा हा उपाय (वापरण्याची अत्यंत सोपी आणि योग्य पद्धत)...

कडुनिंबाचा पुरेपूर फायदा मिळवण्यासाठी तो खालील दोन पद्धतीने वापरता येतो...

१. कोवळी पाने चावून खाणे (रक्तशुद्धीसाठी)...

सकाळी उठल्यावर उपाशीपोटी कडुनिंबाची ४-५ कोवळी (लालसर किंवा फिकट हिरव्या रंगाची) पाने घ्या. ती मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुवून घ्या आणि थेट तोंडात टाकून बारीक चावून खा. पानांचा रस हळूहळू गिळा.

२. कडुनिंबाच्या पाण्याने अंघोळ (त्वचेच्या आजारांसाठी) ...

एका मोठ्या पातेल्यात पाणी घ्या आणि त्यात कडुनिंबाची १५-२० पाने टाकून ते चांगले उकळून घ्या. पाण्याचा रंग थोडा हिरवट झाल्यावर गॅस बंद करा. हे उकळलेले औषधी पाणी तुमच्या अंघोळीच्या कोमट पाण्यात मिसळा आणि या पाण्याने अंघोळ करा. साबणाचा वापर टाळल्यास अधिक उत्तम!

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

वॉर्निंग (वॉर्निंग - वापरताना घ्यायची काळजी आणि महत्त्वाची पथ्ये)...

हा पारंपरिक उपाय अतिशय सुरक्षित असला, तरी काही विशिष्ट गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे...

१. अतिसेवन पूर्णपणे टाळा... कडुनिंब प्रकृतीने उष्ण आणि अतिशय कडक असतो. त्यामुळे रोज ४-५ पानांपेक्षा जास्त पाने खाऊ नका. तसेच, सलग १५ दिवस पाने खाल्ल्यानंतर पुढचे १५ दिवस खंड (ब्रेक ) द्यावा आणि नंतर परत सुरू करावे.

२. गरोदर महिलांसाठी इशारा...

गरोदर महिलांनी (प्रेग्नन्ट वूमन) आणि स्तनपान करणाऱ्या मातांनी कडुनिंबाची पाने खाणे शक्यतो टाळावे. याच्या उष्णतेमुळे गर्भाला त्रास होऊ शकतो. (अंघोळीसाठी पाण्याचा वापर मात्र त्या करू शकतात.)

३. शुगर खूपच कमी असल्यास (लो ब्लड शुगर) कडुनिंब रक्तातील साखर वेगाने कमी करतो. त्यामुळे ज्यांची शुगर आधीच लो असते, त्यांनी पानांचे थेट सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा.

***

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### गंध मातीचा

जलधारा वेगे धावून
धरतीच्या कुशीत लपता
गंध मातीचा येतो
पावसाच्या आगमनाने मग
सान थोरांसवे बळीराजाला
आनंद अपार होतो

धरतीची तृष्णा माटविण्या
जलधारा या बरसती
गंध मातीचा दरवळतो
ओलीचिंब होवून धरा
प्रसन्न होते वातावरण
बळीराजा पेरणीला लागतो

# निखळ आनंदाच नातं- मैत्रीचं...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आयुष्याचे सर्वात सुंदर नाते मैत्रीचे. ''मित्र'' हा शब्द उच्चारताच डोळ्यांसमोर उभी राहते ती हक्काची माणसे, ज्यांच्यासमोर आपल्याला मुखवटा घालण्याची गरज नसते. रक्ताची नाती आपल्याला जन्माने मिळतात, पण मैत्री हे एकमेव असे नाते आहे जे आपण स्वतःच्या आवडीने निवडतो आणि आयुष्यभर जपतो.मैत्री म्हणजे नक्की काय? मैत्री म्हणजे रोज भेटणे किंवा तासनतास बोलणे नव्हे. मैत्री म्हणजे एकमेकांच्या सुख-दुःखात खंबीरपणे पाठीशी उभे राहणे. जेव्हा संपूर्ण जग आपल्या विरोधात असते, तेव्हा ''काळजी करू नको, मी आहे ना तुझ्यासोबत!'' हा विश्वास देणारा शब्द म्हणजे मैत्री. मित्रांसोबत घालवलेला प्रत्येक क्षण हा आठवणींचा एक मौल्यवान ठेवा बनतो. शाळेच्या बाकावर एकत्र खाल्लेला डबा असो किंवा कॉलेजमधील कट्ट्यावरची चहा, या साऱ्या आठवणी मनाच्या एका कोपऱ्यात नेहमी जिवंत असतात..




ज्याच्या जवळ मनातील भाव व्यक्त करतांना लज्जा संकोच वाटत नाही, खोटे बोलावेसे वाटत नाही, फसवावेसे वाटत नाही पाप-पुण्याची कबुली देण्यास मनकचरत नाही, ज्याला आपला पराक्रम कौतुकाने सांगावासं वाटतो, ज्याच्याजवळ पराभवाचे शल्य उघडे करायला कमीपणा वाटत नाही, ज्याच्या सुखदुःखाशी आपण एकरूप होऊ शकतो तो खरा मित्र आणि ती खरी मैत्री.

बंधना पलीकडले हे एक नाते असते. शब्दाचे त्याला बंधन नसते. दुःखाला तिथे थारा नसतो आणि गोडवा मैत्रीत असतो.

भारतात ऑगस्टमध्ये येणाऱ्या पहिल्या रविवारी मैत्री दिवस साजरा केला जातो.

''फ्रेंडशिप डे'' अर्थातच मैत्री दिवस. हा संपूर्ण जगात उत्साहात साजरा केला जातो, कारण असा एखादाच कोणी माणूस असेल ज्याला मित्र नाही, आणि ज्याला मैत्रीचे महत्त्व ही माहीत नाही. आपल्या सर्वांच्या आयुष्यात कमी - अधिक प्रमाणात मित्र असतात, मित्रांसमवेत घालवलेला वेळ कोणास आवडणार नाही. विशेषतः बालपणातील मैत्री खूप घट्ट असते. ज्याची आठवण कायमची मनात राहते. मैत्रीच्या नात्यात जात धर्म वगैरेला महत्त्व नसते आणि त्याचा अडथळा नसतो त्या नात्याला एक खास महत्त्व आहे.

मैत्री एक असं नातं आहे ज्याला एखादी व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार निवडतो. बालपणात नकळत बरेच मित्र बनून जातात. ज्यामध्ये काही मित्र असेही असतात जे शाळेपासून ते कॉलेजपर्यंत साथ देतात तर काही चांगल्या आणि वाईट काळात देखील आपली मैत्री निभावतात. तथापि असे मित्र फारच कमी असतात जे आयुष्यभर आपली मैत्री जपतात. म्हणून मैत्री करताना आपण सावध असायला हवे.

आपण सहजच म्हणत असतो -''समान गुणे व्यसनेशुच् सख्यम्''




मित्र असे असतात ज्यांचा सहवास आपल्या वर्तमान आणि भविष्यावर प्रभाव टाकत असतात . वाईट सवय असलेल्या मित्रांचा सहवास आपल्याला आणि आपल्या भविष्याला खराब करतात, तर चांगली विचारसरणी आणि चांगल्या सवयी असलेले मित्र आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि आपल्या जीवनाला सुशोभित करण्यास मदत करतात.

आजकाल मित्रांना अनेक वर्गात विभागले आहेत जसं की एक सारखा छंद जोपासणारे मित्र, व्यवसायी मित्र, कामाच्या ठिकाणचे मित्र, इत्यादी पण जे खरे मित्र असतात त्यांची आवड निवड एक सारखी असते. ते आपल्याला आयुष्याचा पदोपदी साथ देतात ते नेहमीच आपल्या चांगल्याचा विचार करतात.

आपल्या आयुष्यात देखील असा कोणी खरामित्र असेल तर त्याला मैत्री दिनाच्या या खास प्रसंगी आपल्या त्या खास मित्राला तो खास असल्याची जाणीव नक्कीच करून देत असतो. हा दिवस आपल्या जिवलग मित्रांसह साजरा केले जातो. बरेच लोकं हा दिवसआपल्या मित्रांसह साजरा करण्यासाठी विविध योजना आखून हा दिवस साजरा करतात. संपूर्ण दिवस जरी नाही तरी जेवढे शक्य असल्यास आपल्या व्यस्ततेमधून काही क्षण आपल्या मित्रांसाठी नक्की काढतो,वा काढावे.

(क्रमशः)




## धनश्री पठाडे हिचे ग्लोबल शेपर्स ॲन्युअल समिट - २०२६ मध्ये प्रभावी प्रतिनिधीत्व

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर -मराठवाड्याची कन्या धनश्री शेषराव पठाडे हिने नुकतेच स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या मुख्यालयातील ग्लोबल शेपर्स ॲन्युअल समिट-२०२६ मध्ये पुणे हबचे प्रभावी प्रतिनिधीत्व करत जागतिक व्यासपीठावर कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

सिग्नल्स फॉर फ्युचर या मुख्य संकल्पनेवर आधारित या आंतरराष्ट्रीय परिषदेत जगभरातील १२० हून अधिक देशांतील सुमारे ४५० युवा नेते सहभागी झाले होते. स्थानिक समस्यांवर युवकांच्या माध्यमातून शाश्वत उपाय शोधणे आणि जागतिक स्तरावर सकारात्मक बदल घडवणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. ग्लोबल शेपर्स कम्युनिटी ही वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा एक भाग आहे.

### विविध सत्रांत सहभाग

छत्रपती संभाजीनगरची धनश्री पठाडे सध्या ग्लोबल शेपर्स कम्युनिटी, पुणे हबच्या क्युरेटर म्हणून कार्यरत आहेत. या परिषदेदरम्यान तिने एआय, शाश्वत विकास, मानसिक व महिला आरोग्य, युवक रोजगार, प्लास्टिक प्रदूषण, डिजिटल सुरक्षितता आणि लॉन्जेव्हिटी इकॉनॉमी या विषयांवरील सत्रांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. यशाची श्रेय ग्लोबल शेपर्स कम्युनिटीला या यशाचे श्रेय धनश्री पठाडे यांनी संपूर्ण ग्लोबल शेपर्स कम्युनिटी पुणे हबमधील सर्व शेपर्स, माजी सदस्य आणि आपल्या प्रवासात साथ देणाऱ्या प्रत्येकाला दिले आहे. एका सामान्य मराठी मुलीवर विश्वास ठेवून, तिला नेतृत्वाची संधी देऊन आणि समाजासाठी काम करण्याचा आत्मविश्वास देणाऱ्या या समुदायामुळेच जागतिक स्तरावर पुणे हबचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याचे धनश्रीने सांगितले.यंदाच्या कार्यकाळात हरित कुमार ( व्हाईस क्युरेटर करत आहे) आणि शर्वरी रास्ते यांच्यासोबत धनश्री पठाडे पुणे हबच्या क्युरेटरशिप टीमचे नेतृत्व करत आहेत. २०१२ मध्ये अंशू गौर यांनी पुण्यात ग्लोबल शेपर्स हबची स्थापना केली. तेव्हापासून अनेक शेपर्स आणि माजी सदस्यांनी समाजाभिमुख कार्य, नेतृत्व आणि समुदायभावनेची समृद्ध परंपरा निर्माण केली आहे. याच परंपरेचा आणि संस्कृतीचा वारसा पुढे नेत, पुणे हबने गेल्या अनेक वर्षांत उभा केलेला प्रभाव अधिक सक्षम करण्यासाठी आणि नव्या युवकांना समाजपरिवर्तनाच्या प्रवासात सहभागी करून घेण्यासाठी यंदाची क्युरेटरशिप टीम सातत्याने कार्यरत आहे.

### स्थानिक तरुणांनी पुढाकार घ्यावा

मराठवाड्याच्या मातीतून सुरू झालेला प्रवास जागतिक व्यासपीठापर्यंत पोहोचू शकतो, हा विश्वास देणारा हा अनुभव आहे. येथील दुष्काळ, पाणीटंचाई, शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी स्थानिक तरुणांनी पुढे येणे आवश्यक आहे. ग्लोबल शेपर्ससारखी व्यासपीठे त्यांना नक्कीच जागतिक मार्गदर्शन करून संधी मिळवून देतील.

**- धनश्री पठाडे**

## मदनसुरीच्या भूमिपुत्राचा मानद डॉक्टरने सन्मान

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नाशिक : निलंगा तालुक्यातील मदनसुरी या ठिकाणचे श्री अशोक रामराव देशपांडे हे गेले २८ वर्षापासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.

राम कथाकार, भागवत कथाकार, प्रवचनकार, व्याख्याते, लेखक आणि कवी अशा विविध अंगी पद्धतीने ते कार्य करत आहेत.

शिक्षण क्षेत्रातील आणि अध्यात्म क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

मुंबईतील माटुंगा या ठिकाणी ९ ऑगस्ट ला होणाऱ्या दिमाखदार सोहळ्यामध्ये हा पुरस्कार त्यांना प्राप्त होणार आहे.



देशभरातील अनेक ठिकाणी त्यांच्या रामकथा आणि भागवत कथा मुळे ते सर्वांना परिचित आहेतच. याचबरोबर विद्यार्थ्यासाठी लिहिल्या त्यांच्या ग्रंथामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये ही प्रिय आहेत.

अनेक शाळा कॉलेजेस मध्ये त्यांची व्याख्याने मोठ्या प्रमाणावर होत असतात.

यापूर्वी त्यांना ५० पेक्षा जास्त पुरस्कार प्राप्त झालेले असून शिक्षण तज्ञ, अध्यात्मभूषण, आदर्श शिक्षक पुरस्कार, समाज रत्न पुरस्कार यासोबतच अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत.

त्यांना मानद डॉक्टरेट पुरस्कार प्राप्त झाल्या नंतर सर्वच थरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### मानावा राम सर्वदा कर्ता..

संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात -
"ठेविले अनंते तैसेचि राहावे । चित्ती असो द्यावे समाधान ॥"
याच भावनेचा प्रतिध्वनी ईशावास्य उपनिषदातही ऐकू येतो.
ईशावास्य उपनिषदातील पहिले मंत्रातील प्रसिद्ध वचन आहे "तेन त्यक्तेन भुञ्जीथा"। याचा शब्दशः अर्थ पाहिला तर - "त्याग करून भोगावे" किंवा "त्यागाच्या भावनेने उपभोग घ्यावा" असा होतो. परंतु येथे प्रश्न निर्माण होतो की, नेमके काय त्यागायचे?
येथील "त्याग" म्हणजे आपण ज्या गोष्टीला घट्ट धरून बसलो आहोत, जिच्याशी आपण आसक्त झालो आहोत, जिच्यातच सुख आहे असे मानून तिला चिकटून राहिलो आहोत, त्या आसक्तीचा त्याग होय. उदाहरणार्थ, रामायणात भगवान श्रीरामांच्या राज्याभिषेकाच्या वेळी मंथरेच्या शब्दांना भुलून कैकेयीने आपल्या पुत्र भरतासाठी राजगादीची मागणी केली. जर तिने त्या मोहाचा त्याग केला असता, तर तिला मिळालेल्या सुखाचा उपभोग ती शांतपणे घेऊ शकली असती.
तसेच पंचवटीत सर्व प्रकारच्या ऐहिक सुविधांचा अभाव असूनही सीतामाता श्रीराम आणि लक्ष्मणांसोबत अत्यंत आनंदाने आणि समाधानाने जीवन जगत होती.
परंतु सुवर्णमृगाबद्दल निर्माण झालेल्या आकर्षणाने संपूर्ण परिस्थिती बदलून गेली. जर त्या इच्छेचा त्याग केला असता, तर जे प्राप्त होते त्यातच ती आनंदी राहू शकली असती.
त्याचप्रमाणे, रावण सोन्याच्या लंकेत प्रचंड वैभवात जीवन जगत होता. परंतु सीतेला प्राप्त करण्याच्या एका इच्छेमुळे त्याचे संपूर्ण जीवन विस्कळीत झाले. जर त्याने त्या एकाच इच्छेचा त्याग केला असता, तर तो आपल्या प्रिय पत्नी मंदोदरी, पुत्र मेघनाद आणि प्रिय भाऊ विभीषण यांच्यासह आयुष्यभर सुखाने राहू शकला असता.
माझ्या मते, या उदाहरणांमधून एक गोष्ट स्पष्टपणे सिद्ध होते की, प्रकृतीमध्ये कोणतीही कमतरता नाही. आपण मात्र अज्ञानामुळे एखाद्या गोष्टीला धरून बसतो आणि त्यामुळे जे प्राप्त झाले आहे, त्याचा आनंद घेण्यास असमर्थ ठरतो.
म्हणूनच उपनिषदकारांनी अत्यंत संक्षिप्त पण गहन शब्दांत सांगितले आहे "तेन त्यक्तेन भुञ्जीथा" त्यागाच्या भावनेने उपभोग घ्या; आसक्ती सोडा आणि प्राप्त जीवनाचा आनंद घ्या.
अस्तु।
सर्वांचे मंगल होवो. 🙏
कृतज्ञ मी कृतार्थ मी 🙏
भगवंत हृदयस्थ आहे 🙏



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'मामा' (माहेरचा समृद्ध दुवा)

पुढे.......
त्यांची स्वतःची आर्थिक परिस्थिती अगदी नाजूक असताना सुद्धा मामांनी माझ्या आईला तिच्या प्रत्येक अडचणीत वेळोवेळी खूप मदत केली. तिचे आई-वडील तर ती लहान असतानाच वारले होते; त्यामुळे मामाच तिचे आई-वडील झाले. त्यांनीच तिला सांभाळले, शिकवले आणि योग्य वेळी लग्न करून दिले. आई आणि मामा यांच्यातील अतूट व जिव्हाळ्याच्या बंधनाचा एक अतिशय हृदयस्पर्शी प्रसंग मला आजही आठवतो. एकदा आई खूप आजारी होती, त्यावेळी मी लहान होतो. मामा शहरात राहत असल्याने आईला त्यांच्याकडेच ठेवावे लागले. नंतर तिला रुग्णालयात दाखल करावे लागले आणि तिचे एक मोठे ऑपरेशन झाले. त्या दरम्यान तिला प्रचंड रक्तस्राव झाला होता आणि तातडीने रक्ताची गरज निर्माण झाली होती. अशा वेळी माझे मामा तिथे देवासारखे धावून आले. त्यांनी स्वतःचे रक्त देऊन माझ्या आईचे प्राण वाचवले! अशा कधीही न विसरता येणाऱ्या मामांच्या अनेक आठवणी माझ्या आठवणींच्या कप्प्यात जपलेल्या आहेत. लहानपणीच्या आठवणींचा पट उलगडला, की उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि 'मामाचं गाव' हे समीकरण सर्वात आधी डोळ्यांसमोर येतं. (क्रमशः)

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### शिस्त - यशाचा सर्वात स्वस्त पण प्रभावी मंत्र

आपल्या आजूबाजूला अनेक बुद्धिमान, गुणी आणि कष्टाळू माणसं दिसतात. काहींच्याकडे अफाट प्रतिभा असते, मोठी स्वप्नं असतात, मेहनत करण्याची तयारीही असते. तरीही त्यांचं यश अर्धवट का राहतं? आणि काही साधी, सामान्य माणसं मात्र आयुष्यात मोठी उंची कशी गाठतात?
या प्रश्नाचं उत्तर एका शब्दात दडलं आहे—शिस्त.
यशाचा असा कोणता गुपित मंत्र आहे जो प्रत्येकाला परवडणारा आहे, पण त्याचे फळ अमूल्य आहे? त्याचे उत्तर एकाच शब्दात दडलेले आहे— 'शिस्त' (Discipline).
शिस्त ही बाजारात विकत मिळणारी गोष्ट नाही; ती पूर्णपणे मोफत आहे. पण आजच्या जगात हीच मोफत मिळणारी शिस्त पाळणे लोकांना सर्वात कठीण वाटते.
शिस्त म्हणजे स्वतःवर केलेली सक्ती नाही; शिस्त म्हणजे स्वतःवर केलेलं प्रेम. कारण जी व्यक्ती स्वतःच्या भविष्यावर प्रेम करते, ती वर्तमानातील आळसाला कधीच जिंकू देत नाही.
नशिबाने दार ठोठावलं तर संधी मिळते; पण शिस्त अंगीकारली तर यश कायमचं घर करतं.आज प्रत्येकाला यश हवं आहे. प्रत्येकाला मोठं व्हायचं आहे. नाव, पैसा, प्रतिष्ठा, सन्मान... सगळं हवं आहे. पण एक प्रश्न मात्र फार कमी लोक स्वतःला विचारतात...
"मी माझ्या स्वप्नांसाठी रोज किती प्रामाणिक आहे?"
यश ही एका दिवसात घडणारी घटना नसते; ती रोज केलेल्या छोट्या-छोट्या चांगल्या सवयींची कमाई असते. पहाटेचा गजर वाजल्यानंतर पुन्हा झोपण्याऐवजी उठणं... दिलेला शब्द पाळणं... वेळेचं महत्त्व ओळखणं... रोज थोडंसं का होईना, पण ध्येयासाठी काम करणं... हीच शिस्त आहे.बांबूचं झाड पहिल्या काही वर्षांत जमिनीवर फारसं वाढत नाही. पण त्या काळात त्याची मुळे खोलवर पसरत असतात. आणि मग एक दिवस ते झपाट्याने आकाशाकडे झेपावतं. शिस्तही अशीच असते.
'लहान पण सातत्यपूर्ण कृती'.
शिस्त म्हणजे लष्करी नियम पाळणे नव्हे, तर 'जे करायला हवे ते, मन नसतानाही करण्याची क्षमता निर्माण करणे!'
निसर्गही आपल्याला शिस्त शिकवतो. सूर्य रोज वेळेवर उगवतो. ऋतू ठरलेल्या वेळी बदलतात. नदी सतत वाहते. म्हणूनच निसर्ग सुंदर आहे. माणसाचं आयुष्यही शिस्तीनेच सुंदर होतं.
एक दिवस तुमची मुलं तुमचं बोलणं विसरतील; पण तुमचं जगणं लक्षात ठेवतील. म्हणून त्यांना यशाचा शॉर्टकट शिकवू नका; शिस्तीचा मार्ग दाखवा.
आयुष्याच्या शेवटी लोक तुमच्या नशिबाची चर्चा करणार नाहीत; ते तुमच्या सातत्याची, तुमच्या शिस्तीची आणि तुमच्या कर्तृत्वाची चर्चा करतील.आजच स्वतःच्या मनाचे मालक व्हा, आळसाला गाडून टाका... आणि 'विचार ते विजय' या प्रवासात यशाचे मानकरी बना!

■ आजचा विजयमंत्र

"शिस्त ही यशाची किंमत आहे. ही किंमत रोज थोडी-थोडी भरावी लागते. पण एक दिवस तिचंच व्याज यश, समाधान आणि सन्मानाच्या रूपाने आयुष्यभर मिळत राहतं."

# 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठेचे - आदर्श विचार तरुण पिढीने आत्मसात करणे गरजेचे'

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतात अनेक थोर नेत्यांचे महापुरुषांचे जयंती, पुण्यतिथी हे विशेष दिन म्हणून साजरे केले जातात. आजमितीस साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती देशभर तर साजरी होतेच पण विदेशातही धुमधडाक्यात साजरी होत आहे. १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्हा वाळवे तालुकास्थित वाटेगाव या खेडेगावात एक तेजस्वी क्रांतीसुर्य उगवला तो म्हणजे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व आई वालुबाई ह्या होत.

विशेष म्हणजे नवीन जन्मास आलेल्या बाळाचे नाव हे बारशाच्या दिवशी ठेवले जाते. त्या चालिरिती, रितीरिवाजानुसारच अण्णाभाऊ च्या बारशाच्या दिवशीच त्यांचे तुकाराम हे नाव ठेवण्यात आले. जसे तुकाराम हे भजन, किर्तन, प्रर्वचनाने सर्व जगभरात प्रसिध्द झाले तसेच अण्णाभाऊ साठे चा नामकरी तुकाराम हे योगायोगाने लोकशाहीर नव्हे तर नुसते साहित्यिक नव्हे तर साहित्यसम्राट या उपाधीने जगभरात त्यांचा नावलौकीक झाला. तसे पाहिले तर अण्णाभाऊंना अत्यंत खडतर, हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगावे लागले. पददलित व जात कुळ हे मातंग समाजात असल्यामुळे म्हणतातना दारिद्र दैवावस्था ही जणुकाही पाचवीप्रमाणे पुंजलेलीच असायची. तरी अण्णाभाऊंच्या आईंनी धीर सोडला नाही.


या लेकराला कष्ट करुन इतरांचे बोलणे, शिव्याशाप खाऊन कष्ट उपासायचे व मोठे करायचे असे ठान मनी मांडले. म्हणतात ना लहानपण देगा देवा, तया मोठे पण येवा. यानुसार या वयात फकीरा, वीस सत्तू पिराजी यांच्या गोष्टी सांगितल्या व योग्य ते संस्कार दिले. आईकडून मिळालेला सुसंस्कारामुळे अण्णाभाऊंना प्रचंड बुध्दीमत्ता लाभली. असे म्हणतात की, अवघे दिड दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊंनी दिडशे पुस्तके लिहिली. १९४२ साली मध्ये



लोकसाहित्य, युगांधर, लोकयुध्द साप्ताहिकात अण्णाभाऊंनी वार्ताहर पदाची धुरा सांभाळली.

अण्णाभाऊंचे पहिले कलापथक लाल बावरा यांची निर्मिती १९४४ साली मशाल साप्ताहिकात व दिवाळी अंकात पहिली कथा लिहिली. अणाभाऊ हे जागतिक किर्तीचे कलाकार व कादंबरीकार म्हणून प्रकाझोतात आले.

अण्णाभाऊंचा विशेष विचार व संदेश खालील प्रमाणे पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून कष्टकरी व दिनदलितांच्या हातावर तरलेली आहे. तसेच अण्णाभाऊंनी १९६१ साली विदेशात रशियात गेले व तेथे शिवाजी महाराजांचे चरित्रे पोवाड्यातून, चौकाचौकात व प्रमुख शहरात कथन केले. तत्कालिन परिस्थितीत महापुरुषांबद्दल अण्णाभाऊंचे योगदान व दुरदृष्टीला ही फार मोलाची वाखाण्याजोगी होती, असे म्हणावयायस हरकत नाही. तर सध्याच्या नेत्यांनी महाराष्ट्र माझा कुठे नेऊन ठेवलाय ? विकणे व खरेदी करणे राजकारण करुन




महाराष्ट्राच्या चिंध्या-चिंध्या उडवल्या जात आहे. सद्यस्थिती महाराष्ट्राची ही एक फार मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

तसेच अण्णाभाऊत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव सातत्याने असायचा व त्यांच्या ओठावरी सातत्याने हे बोल असायचे.

जग बदल घालुनी घाव
सांगून गेले मज भीमराव

यानुसार अण्णाभाऊ डॉ. बाबासाहेबांचे व शिवाजी महाराजांचे विचार सांगून रशियात जयंती साजरी केली. पददलित व लाचारिने, गरीबीने, असहायतेने जीवन जगणारी माणसे ही अन्यायाविरुध्द पेटून उठली पाहिजे, अशी बुलंद व प्रखर लेखणी अण्णाभाऊंनी केली. त्यांनी त्यांच्या संपूर्ण आयुषत या दोनच गोष्टींचा तिरस्कार केला एक म्हणजे श्रीमंत माणसाकडून होणारी गरीबांची पिळवणूक थांबली पाहिजे, दुसरी म्हणजे अस्पृश्य समाजाची होणारी पिळवणूक व आर्थिक कुचंबना परवड ही कुठवर सहन करायची ? अशा लोकशाहीराचे साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठेंचे दिनांक १८ जुलै १९९६ रोजी निधन झाले. शेवटी त्यांचा १ ऑगस्ट हा जयंती दिन या निमित्त माझे कोटी कोटी नमन.

अण्णाभाऊंच्या या प्रमुख कार्याने, विचाराने माझे मन बहरले व ओठावरी काव्य स्फुरले.

अण्णाभाऊ महान साहित्याची खान
वाढली जगामध्ये भारताची शान
जीवाला देऊनिया जीवाचे दान
फुलविलं हे समतेच रान
जगी नाव तयाच गाजे
किर्तीचा डंका जगभर वाजे
जातीयवादी लेखकाची केली धुळधान
वाढली जगामध्ये भारताची शान
असं लिहिलय साहित्य लिखान
जणु मडक्यात घातली जान
उंच झाली भारताची मान
जाग स्वाभिमानाला जागे स्वाभिमान
काय सांगू तुम्हा आता नवलाई
जयंती अण्णाची जगभर साजरी होई
हेच खर गान हच खरे गान
वाढली जगामध्ये भारताची शान
अण्णाभाऊ महान भारताची खाण.

# वाचू आनंदे.....!

**ज्योतिर्मय साहित्य**




''डी. डी. सह्याद्री'' या वाहिनीवर ''वाचू आनंदे'' हा साहित्य प्रेमींचा मराठमोळा अगदी साहित्य वंदनीय कार्यक्रम दाखविला जातो. या कार्यक्रमात मोठ-मोठ्या लेखकांनी, कवींनी लिहिलेल्या त्यांच्या साहित्यांचे वाचन व कथन त्यांच्या शब्दात केले जाते. त्या वाचनातून स्वानुभव सांगितले जातात. कथा, कादंबऱ्या, कविता आणि आपल्या आयुष्यात मिळणाऱ्या अनुभवाने व पुस्तक वाचनाने माणूस खरा वाचक बनतो. कारण, पुस्तकाचे, वाचनाचे अनुभव हे आयुष्यभरासाठी आपल्या सोबत असतात. निरंतर वाचनामुळे आपण स्व-अस्तित्वाला गवसणी घालतो. स्व-अस्तित्व जाणतो. निरंतर वाचनामुळे वाचनाची प्रगल्भता अधिकाधिक व्यापक होते.




त्या प्रगल्भतेतूनच खरा आणि सच्चा निष्ठावान वाचक जन्माला येतो. वाचताना व त्या आठवणी सांगताना , कथन करताना जो आनंद मिळतो तो आनंद उच्च कोटीचा असतो.

खरंच, महाराष्ट्राला अतिशय दिग्गज असे प्रतिभावान दर्जी लोक लाभले. ज्यांनी महाराष्ट्राचे नाव अख्या जगतावर सुवर्णाक्षरात कोरून ठेवले. त्यांच्या लेखन शैलीमुळे, कलेमुळे आज महाराष्ट्राला एक वेगळीच ओळख मिळाली आहे.

महाराष्ट्राचा लौकिक वाढला आहे. वाचू आनंदे या कार्यक्रमाच्या माध्यमातून कथा, लेख, स्तंभलेख, अग्रलेख, कविता, कादंबऱ्या यांचे वाचन करून ते वाचकांपर्यंत (प्रत्येकापर्यंत) अगदी सहजरीत्या पोहोचविले जाते आहे.

खरंच, माणूस शिक्षणाने जेवढा हुशार, तल्लख, बुद्धिमान बनतो त्या पेक्षा वाचनामुळे सुबकरित्या घडतो आणि स्वतःला घडवितो. वाचनाची आवड स्वतःला जडविण्यासाठी, वाचनाची आवड लावण्यासाठी कुठल्याही प्रकारची कसरत करावी लागत नाही. एकदा पुस्तक हाती घेतले की मग आपोआप वाचनाची आवड निर्माण होते. जडते. आपल्या महाराष्ट्रातील अशा कित्तेक दिग्गज लेखकांनी आपले लिखाण वाचकांसाठी लिहून वा उपलब्ध करून ठेवले आहे. रोजच्या धकाधकीच्या आयुष्यातून थोडासा विरंगुळा काढत पुस्तक हाती घेऊन वाचनाची आवड निर्माण केली की आपोआप मन वाचनामध्ये रमायला लागते. एवढी प्रचंड जादू वा शक्ती आहे पुस्तकांमध्ये. अक्खे ग्रंथालय आपल्यासाठी सदैव खुले असते.

आपल्यासमोर तऱ्हेतऱ्हेच्या कथा, कादंबऱ्या, कविता, चारोळ्या, ओळी, लेख अजून बरेच कांही. ''वाचू आनंदे'' या कार्यक्रमाच्या माध्यमातुन असंख्य साहित्य प्रेमी, वाचक, लेखक, कवि, कादंबरीकार, कथाकार हे साहित्यातले, वाचनातले आयुष्यात घेतलेले अनुभव, स्वानुभव कथित करीत असतात. खरंच, वाचनातील अनुभव म्हणजे ''आनंदच आनंद'' आणि ''वाचू आनंदे'' होय. म्हणून प्रत्येकाने वाचनाची आवड जोपसावी. आणि आयुष्य पुस्तकमय व वाचनमय करावे. मराठी साहित्यांमध्ये खूप सुंदर अशी पुस्तक शृंखला आहे. ज्यामध्ये मधुरता, रसाळता शब्दा शब्दात आढळते. आपल्या मराठी साहित्याचा साहित्य वारसाच इतका प्रचंड आहे की, माणूस त्या साहित्यात स्वतः ला वाहून वा झोकून देईल. वाचनातून मिळालेले अनुभव हे आयुष्य आणखीनच सुंदर व सुबक बनवितात. म्हणूनच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ''वाचाल तर वाचाल''.

# क्रांतीकारी क्रोधधारी स्वातंत्र्य सैनिक गोविंद चरणकार

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अध्वर्यु शहीद भगतसिंग हे क्रांतीकारक होतेच पण त्याचबरोबर साहित्यिक होते आणि राजकीय पत्रकार होते. भगतसिंगांचे कीर्ती मासिकाशी असलेले योगदान हे क्रांतीकारी चळवळीतील त्यांच्या विचारप्रसाराचा, आणि तरुणाईला संघटित करण्याचा एक महत्वाचा भाग आहे. सुमारे १९२६-२७ च्या आसपास भगतसिंग लाहोरमध्ये कीर्ती किसान पक्ष आणि या पक्षाच्या कीर्ती मासिकाशी जोडले गेले आणि या मासिकाच्या माध्यमातून त्यांनी वामपंथी, क्रांतीकारी आणि समाजवादी विचारांचा प्रचार केला. कीर्ती मासिकामध्ये भगतसिंग यांनी काकोरी के वीरों से परिचय हा लेख लिहून काकोरी क्रांतीकारकांच्या स्मृतीला दिलेली वैचारिक आणि भावनिक हृदयस्पर्शी आठवण आहे. या लेखातून काकोरी दरवड्यातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभागी वीरांची ओळख त्यांनी करून दिली आहे. काकोरी दरवड्यात प्रत्यक्ष सहभागी नसलेल्या परंतु या दरवड्यासाठी अप्रत्यक्ष मोठा सहभाग असलेल्या गोविंद चरणकार या स्वातंत्र्यसैनिकाचा उल्लेख या लेखात आहे.

गोविंद चरणकार हे एक जुने व प्रखर आणि क्रोधधारी स्वातंत्र्यलढ्यातील लढवय्ये सैनिक होते. गोविंद चरणकार यांचे पहिले धाडसी कार्य १९१८- १९१९ मध्ये ढाका येथे घडले. ब्रिटिश पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला तेंव्हा त्यांनी त्यांच्या गोळीबाराला गोळीबाराने उत्तर दिले. त्यांच्या पिस्तुलमधील गोळ्या संपल्यानंतर ते जखमी होऊन पकडले गेले. त्यावेळी त्यांना काळ्यापाण्याची शिक्षा झाली. १९२२ मध्ये प्रकृती खालावल्यामुळे त्यांची कैदेतून सूटका करण्यात आली. भारताला स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे या ध्येयवादातून १९२५ मध्ये पुन्हा ते हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशनच्या क्रांतीकारी संघटनेत सामील झाले. काकोरी दरवड्या संदर्भात दाखल करण्यात आलेल्या खटल्यात गोविंद चरणकार उर्फ डी.एन. चौधरी यांना जन्मठेप व काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.

गोविंद चरणकार यांचे नाव भगतसिंग यांनी कीर्ती मासिकाच्या काकोरी के वीरों से परिचय या लेखात १९२७ मध्ये लिहिल्यामुळे त्यांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी केलेल्या क्रांतीकारी कार्यास ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले. या लेखात गोविंद चरणकार यांच्या समवेत पंडित रामप्रसाद बिस्मिल, अशफाकउल्ला खान, राजेंद्रनाथ लाहिडी, ठाकूर रोशन सिंह, मन्मथनाथ गुप्त, जोगेशचंद्र चटर्जी, सुरेशचंद्र भट्टाचार्य, राजकुमार, विष्णुशरण दुबलिश, रामदुलारे त्रिवेदी, शचींद्रनाथ सन्याल यांचा उल्लेख क्रोधकारी व भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी जीवाची पर्वा न करणारे क्रांतीकारी स्वातंत्र्यसैनिक असा केलेला आहे. स्वातंत्र्यलढ्यात कैदेतून सुटका झाल्यानंतर फार कमी स्वातंत्र्यसैनिकांनी पुन्हा स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला, यामध्ये गोविंद चरणकार या क्रोधधारी क्रांतीकारी स्वातंत्र्यसैनिकांचा उल्लेख केला जातो. त्याकाळात स्वातंत्र्य सैनिकांना कैदेमध्ये कठोर कारावासाची शिक्षा भोगावी लागत असे, ब्रिटिश कारागृहांमध्ये दीर्घकाळ कैद, अपुरी वैद्यकीय मदत, आणि अमानुष वागणूक यामुळे बहुतेक क्रांतीकारकांचे आरोग्य खालावत असे. अशा परिस्थितीत सुटका मिळणेही अनेकदा पूर्ण स्वातंत्र्यापेक्षा तात्पुरता दिलासा ठरे. गोविंद चरणकार यांची १९२२ साली प्रकृतीच्या




कारणास्तव सुटका झाल्यानंतर त्यांनी पुन्हा क्रांतीच्या कार्यात सहभाग घेतला. भगतसिंगांनी कीर्तीमध्ये काकोरीच्या वीरावर लिहिताना गोविंद चरणकार यांचा विशेष उल्लेख केला ही बाब अत्यंत महत्वाची आहे. भगतसिंगांचा अभ्यास फक्त राजकीय घोषणांपुरता मर्यादित नव्हता. ते क्रांतीकारकांच्या जीवनकथा, त्यांच्या त्यागाचा अर्थ आणि त्यांच्या कामगिरीचे सामाजिक भान निर्माण करण्यासाठी लेखन करत होते. भगतसिंग यांच्या लेखातील गोविंद चरणकार यांच्या विशेष उल्लेखामुळे ते त्या क्रांतीकारी परंपरेतील एक मानाचे नाव म्हणून जरी मुख्य प्रवाहातील इतिहासलेखनात त्यांना कमी प्रसिद्धी मिळाली असली तरी ते या लेखामुळे ऐतिहासिक ठरले.

काकोरी दरवडा कारवाईत सहभागी झालेल्यांमध्ये काहीजण प्रत्यक्ष ट्रेनमध्ये दरवडा घालण्यात सहभागी होते. काही संघटनात्मक नियोजनात, काही शस्त्रपुरवण्यात, तर काही संपर्क-जाळ्यात होते. क्रांतीकारक गोविंद चरणकारांचे स्थान नेमके कोणत्या विभागात होते, याबद्दल उपलब्ध स्त्रोत्रात मर्यादित माहिती आहे. पण भगतसिंग यांनी कीर्ती मासिकात केलेल्या उल्लेखामुळे त्यांचे नाव प्रमुख क्रांतीकारकांमध्ये गणले गेले. गोविंद चरणकार हे हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन क्रांतीकारी संघटनेतील सक्रीय अनुभवी आणि विश्वासार्ह सहकारी होते असे नक्कीच म्हणता येते. काकोरी खटल्यात फक्त प्रत्यक्ष घटनेतील सहभागीच नव्हे तर संपर्क, मदत, निवास, शस्त्रसाठा, संदेशवहन आणि छुप्या बैठका आयोजित करणारे अनेक कार्यकर्तेही आरोपी ठरले.

काकोरी हे लखनौ जिल्ह्यातील एक छोटेसे गाव असून काकोरी स्टेशन हे लखनौवरुन सहरानपुरला जाणाऱ्या रेल्वे मार्गीवरील तिसरे स्टेशन आहे. ९ ऑगस्ट १९२५ रोजी पं. रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्ला खाँ, राजेंद्र लाहिडी, शचींद्रनाथ बक्षी, मुकुंदीलाल, मन्मथनाथ गुप्त, मुरारी शर्मा, बनवारीलाल आणि चंद्रशेखर आझाद यांनी प्रत्यक्ष काकोरी रेल्वेस्थानकाजवळ रेल्वेवर दरवडा घातला व वाटेत थैल्या उघडून त्यातील पैसे काढून सावधपणे लखनौ शहरात या क्रांतीकारकांनी प्रवेश केला. या साहसात त्यांना पाच सहस्त्र रूपये मिळाले. काकोरीच्या रोमाचंकारी घटनेने ब्रिटिश राजसत्तेला जाणू गदगदा हलवून जागे केले. दमनचक्रे अतिशय वेगाने फिरू लागून एकंदर चाळीस व्यक्तींना पकडण्यात आले.




आरोपितांपैकी चंद्रशेखर आझाद, अशफाकउल्ला खाँ व शचींद्र बक्षी हे फरारी झाले होते. अशफाकउल्ला खाँ व शचीन्द्र बक्षी हे मागाहून कित्येक दिवसांनी सापडले पण चंद्रशेखर आझाद मात्र कधीही पोलीसांच्या हाती लागले नाहीत. प्रारंभीच्या तपासानंतर चाळीस पैकी अठावीस जणांवर खटले दाखल करण्यात आले व बाकीच्यांना सोडून देण्यात आले. शचीन्द्रनाथ संन्याल व योगेश चटर्जी हे क्रांतीकारी स्वातंत्र्यसैनिक काकोरी दरवड्यादरम्यान तुरूंगात होते तरीही हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेचे प्रमुख उत्पादक तेच असल्याचे व या दरवड्यातही नियोजनामध्ये त्यांचा सहभाग उघड झाल्याने त्यांचाही या खटल्यात समाविष्ट करण्यात आला.

या दरवड्यात क्रांतीकारकांना पाच सहस्त्र रूपयाची रक्कम स्वातंत्र्यलढ्यासाठी मिळाली पण, सरकारच्या वतीने दोनशे पन्नास साक्षीदार खटल्यात गोवल्याने या खटल्यासाठी ब्रिटिश शासनाने दहा लक्ष रुपयाहून अधिक खर्च केला. यावरून या क्रांतीकारकांच्या कार्याची व्याप्ती लक्षात येते. या खटल्यामध्ये प्रत्यक्ष दरवड्यात गोविंद चरणकार यांचा सहभाग नसूनही प्रमुख आरोपींमध्ये त्यांचे नाव गोवण्यात आले. यावरूनच क्रोधी क्रांतीवीर गोविंद चरणकार यांचा महत्वाचा सहभाग दिसून येतो. या सर्व आरोपीतांवर सम्राटाविरुद्ध युद्ध घोषित करणे, कट करणे, हत्या करणे, दरवडे घालणे हे आरोप होते. या खटल्यात सरकारच्या वतीने पंडित जगत् नारायणलाल हे काम चालवीत होते. तर आरोपींच्या वतीने पं. गोविंदवल्लभ पंत, बी. के. चौधरी, मोहनलाल सक्सेना व चंद्रभान गुप्त हे काम चालवीत होते. काकोटीची घटना ब्रिटिश राजसत्तेला आवाहन देणारी असल्याने या क्रांतीकारक घटनेला केवढे महत्व दिले गेले हे लक्षात येते.

प्रथम मॅजिस्ट्रेट ऐनुद्दिम यांच्या कोर्टात व नंतर सेशन्स जज्ज हॉयिल्टन या कुप्रसिद्ध न्यायाधिशासमोर हा खटला चालला. राजसत्तेचे व त्यांच्याशी निष्ठा ठेवून फायदा उठविणा-या वैचारिक दासांचे मत काहीही असले तरी सर्वसामान्य जनतेच्या मनात या साहसी व शूर देशभक्तां विषयी उत्कट आत्मीयता होती. यापैकी कोणीही स्वार्थी नसून राष्ट्राचे अपमानाचे पाप धुऊन काढण्यासाठी व भारतीय जनतेने स्वाभिमानाने वैभवपूर्ण जीवन जगावे म्हणूनच या साहसी तरुणांनी आपल्या जीवनाचे यातनामय हवन चालविलेले आहे हे लोक ओळखत होते. नागरीकांनी स्वयंस्फूर्त श्रध्देने निधी जमवून आरोपी ठरविलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या नैर्बंधिक संरक्षणाची व्यवस्था केली. आरोपपत्र घेतलेले वकील श्रेष्ठ देशभक्तच असल्यामुळे त्यांनीही आर्थिक झीज सोसूनच खटला चालविला. बरेच दिवस खटला चालून ६ एप्रिल १९२७ रोजी मुख्य खटल्याचा निकाल स्पेशल सेशन्स कोर्टात लागला. या खटल्यात रामप्रसाद बिस्मिल, रोशनसिंह, राजेंद्रनाथ लाहिडी यांना मृत्युदंड तर अशफाकउल्ला खाँ आणि इतर १५ जणांना वेगवेगळ्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. यामध्ये गोविंद चरणकार यांना दहा वर्षाची सक्तमजुरीची शिक्षक ठोठावण्यात आली. ब्रिटिश सरकारने केलेल्या सूडबुद्धीने चीफ कोर्टाकडे १८ जुलै १९२७ रोजी केलेल्या अपिलात गोविंद चरणकार, मुकुंदीलाल, योगेशचंद्र चॅटर्जी, सुरेश भट्टाचार्य, विष्णुशरण दुबलिस, व मन्मथनाथ गुप्त यांचा समावेश होता.केलेल्या शिक्षा वाढीच्या अपीलाचा निकाल २२ ऑगस्ट १९२७ रोजी लागून गोविंद चरणकार, योगेशचंद्र चॅटर्जी व मुकुंदीलाल यांची दहा वर्षाची शिक्षा जन्मठेप काळ्या पाण्याची करण्यात आली. गोविंद चरणकर हे क्रांतीवीर ब्रिटिश शासनाच्या हिटलिस्टवर होते. हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या सर्वच क्रांतीकारकांना पकडण्यात येऊन शिक्षा झाल्याने संपूर्ण पक्षच नष्ट होण्याचा संभव असल्यामुळे त्यांना तुरूंगातून सोडविण्याचे प्रयत्न निष्फळ ठरल्याने काकोरी गटाचे प्रमुख सुत्रधार पं. रामप्रसाद बिस्मिल जे कवी होते त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना शेवटी निराशा व्यक्त करणार काव्यमय संदेश पाठविला. मृत्यूच्या छायेतील ही कविता पुढीलप्रमाणे आहे.**(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559